नौपाडा पोलीस ठाणे, ठाणे शहर

प्रशांतनगर, एम.जी.रोड, विष्णुनगर, ठाणे(प.) -४००६०२

संपर्क :०२२२५४२३३००

ई–मेल:cp.thane.naupada@mahapolice.gov.in

वेबसाईट:–www.thanepolice.gov.in

<u>जुन्या भांडणाच्या रागातुन जीवे ठार मारण्यासाठी गोळीबार करणा-या अट्टल गुन्हेगारास अवघ्या ४८ तासात अटक करून गुन्हा उघडकीस आणलेबाबत.</u>

दिनांक २७/०३/२०२६ रोजी ००.४५ वा. सुमारास नाशिक मुंबई हायवे, धर्मवीर कट, नौपाडा जि.ठाणे येथील शेल पेट्रोल पंपावर पेट्रोल भरण्याकरीता आलेले फिर्यादी नामे इंजमाम अमीरुददीन सिध्दीकी वय २६ वर्षे, हे त्यांची गाडी ॲक्टीव्हा क्रं.**MH 04 MB 1065** यात पेट्रोल टाकण्यासाठी आले असता यातील आरोपी नामे जबीउल्ला शफीकुररहमान खान याने मागील दोन महिन्यापुर्वी '' तेरा बाप कैसे मरा, ट्रेन से कटकर मराना, कुत्ते के मौत '' असे फिर्यादी यांचे वडीलांबददल अपशब्द वापरल्याचे कारणावरुन त्यांच्यात वारवांर भांडण होत असल्याने त्याचा राग मनात धरुन फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याचे उददेशाने कोणत्यातरी बनावटीचे अग्निशस्त्राने त्यांच्यावर दोन राउंड फायर करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला तसेच त्यांची मैत्रीण नामे इंजल एलबीस फर्नांडीस हीस बंदुकीचा धाक दाखवून फिर्यादी यांची गाडी जबरीने घेवून गेलेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. २७/०३/२०२६ रोजी नौपाडा पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. ८४/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ कलम १०९(१), ३०९(४),३५१(३),३५२ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५ सह महा.पो.कायदा कलम ३७(१), १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमुद गुन्हयातील आरोपी नामे जबीउल्ला शफीकुररहमान खान याने सदर गुन्हा केलेनंतर त्याचे वापरते मोबाईल क्रमांक बंद करुन आपले अस्तित्व लपवुन राहत होता. सदर आरोपीस पकडणे पोलीसांना समोर एक आव्हाहन ठरले होते. मा.वरिष्ठांनी दिलेल्या सुचनाप्रमाणे सलग दोन दिवस आरोपीच्या शोधात असताना **पो.ना/७१८३ सुनिल धोंडे** यांना त्यांचे गुप्तबातमीदारामार्फत मिळालेल्या गोपनीय माहीतीवरुन सदर आरोपी नामे **जबीउल्ला शफीकुररहमान खान वय३९ वर्षे, रा. हजुरी दर्गा नुरी रोड, सिराज खान चाळ, वागळे ईस्टेट, जि.ठाणे** हा रोड नं. ०२, कुसुमाग्रज मार्ग, समतानगर चौक, वागळे ईस्टेट, ठाणे या ठिकाणी येणार असल्याची खात्रीशीर माहीती प्राप्त झाल्याने पोलीस पथकाचे मदतीने सापळा रचुन दिनांक २९/०३/२०२६ रोजी सदर आरोपीस ताब्यात घेण्यात आले असुन आरोपीची अंगझडती घेता त्याचे अंगझडतीमध्ये त्याने गुन्हयात वापरलेले **एक देशी बनावटीचे अग्निशस्त्र (पिस्टल) व गुन्हयात चोरीस गेलेली पांढ-या रंगाची ॲक्टीवा मोटारसायकल** हस्तगत करण्यात आली असुन सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यात यश आले आहे. सदर गुन्हयाचा तपास सपोनि भांगे करीत असुन आरोपीस मा.न्यायालयात हजर करुन त्याची दिनांक ०२/०४/२०२६ पर्यंत पोलीस कोठडी घेण्यात आली आहे.

आरोपी नामे जबीउल्ला शफीकुररहमान खान वय३९ वर्षे, रा. हजुरी दर्गा नुरी रोड, सिराज खान चाळ, वागळे ईस्टेट, जि.ठाणे याचा पुर्व इतिहास खालील प्रमाणे

१.वागळे इस्टेट पो.स्टे.गु.र.नं.१८२/२०१५ भा.द.वि.क.४३५,५११
२. वागळे इस्टेट पो.स्टे.गु.र.नं.२३३/२०१५ भा.द.वि.क.३०७,१४३,१४९ आर्म ॲक्ट ३,२५ आर्म ॲक्ट ४,२५
३. श्रीनगर पो.स्टे.गु.र.नं.०२/२०१८ आर्म ॲक्ट ४,२५
४. वागळे इस्टेट पो.स्टे.गु.र.नं.२२७/२०१८ भा.द.वि.क.३०६,४३६
५. वागळे इस्टेट पो.स्टे.गु.र.नं.२९९/२०२२ भा.द.वि.क.३०७,३२४,५०४,३४
६. वागळे इस्टेट पो.स्टे.गु.र.नं.६१३/२०२५ बी एन एस ३१० (२)
७. वागळे इस्टेट पो.स्टे.गु.र.नं.७४३/२०१८ बी एन एस २२१ महाराष्ट्र दारू बंदी कायदा कलम ८५ (१)
८.राबोडी पो.स्टे.गु.र.नं. /२०१२ भा.द.वि.क.३९९,४०२

सदर कामगिरी ही मा.सहा.पोलीस आयुक्त श्री संभाजीराव जाधव ,वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अभय महाजन,पोलीस निरीक्षक (गुन्हे) दवणे,पो.नि.श्री राठोड (प्रशासन) यांचे मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी मंगेश भांगे,सहायक पोलीस निरीक्षक, पोहवा/६३३४ ईश्वर गोलवड,पोहवा/६४६५ मेहरबान तडवी , पोहवा/२८५ राजेंद्र गायकवाड,पोहवा/५६ सचिन रांजणे ,,पो.ना/७१८३ सुनिल धोंडे , पोशि/४२८० प्रमोद शिंदे, पोशि/७६९५ सारंग कांगणे,पोशि/२५५६ गंगाधर तिर्थकर, पोशि/८१८८ करणकुमार पाटील व पोशि अनिकेत उभे यांनी केलेली आहे.